आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

४ जानेवारी २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महानगरपालिकांच्या निवडणुकीत  १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात / प्रचाराचा धडाका सुरु

- बिनविरोध निवड झालेल्या ठिकाणी पुन्हा निवडणूक घ्यावी अशी उद्धव ठाकरे यांची मागणी

- भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वाराणसीत उद्धाटन

**<u>आणि</u>**

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज समारोप

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आहे. अंतिम उमेदवार यादी काल जाहीर झाली. त्यानुसार राज्यातल्या महानगरपालिकांच्या २ हजार ८६९ प्रभागांमधून १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. एकंदर ३३ हजार ४२७ अर्जांपैकी २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले. त्यातल्या ८ हजार ८४० उमेदवारांनी माघार घेतली.

राज्यात सर्वाधिक १ हजार ७०० उमेदवार मुंबई महापालिका निवडणुकीत, तर १ हजार १६६ उमेदवार पुणे महापालिका निवडणुकीत आपलं नशीब आजमावत आहेत. नागपूरमध्ये ९९३ उमेदवार आहेत. इचलकरंजी महापालिकेसाठी सर्वात कमी २३० उमेदवार  निवडणूक लढवत आहेत.

**<><><><><>**

महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून गेल्याबद्दल विरोधी पक्षांनी न्यायालयात धाव घेतली तरी जनादेश महायुतीच्या बाजूनेच असेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. बिनविरोध निवडीला न्यायालयात आव्हान दिलं जाईल, असं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने काल म्हटलं होतं, त्या पार्श्वभूमीवर

मुख्यमंत्र्यांनी हे विधान केलं. ते चंद्रपूर मधे प्रचार रॅलीत वार्ताहरांशी बोलत होते. विरोधक न्यायालयात जाऊ शकतात, मात्र आपल्याला जनतेने निवडलं आहे याचा पुनरूच्चार मुख्यमंत्र्यांनी केला. तसंच अनेक अपक्ष मुस्लीम धर्मिय उमेदवार देखील बिनविरोध निवडून आल्याचा दावा केला.

फडणवीस यांनी आज अमरावती इथंही भाजपा शिवसेना युतीच्या उमेदवारांसाठी रोड शो केला

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. राज आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबईत शिवसेना भवन इथं जाहीरनामा प्रसिद्ध करत वार्ताहरांशी संवाद साधला. राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला यावेळी दोन्ही नेत्यांनी विरोध केला. बिनविरोध निवडणूक होणं हा लोकशाहीचा आणि लोकांचा अपमान आहे, मतदारांना मतदानापासून वंचित ठेवलं जात असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ज्या ठिकाणी विरोधी उमेदवार नाहीत तिथली प्रक्रिया रद्द करून पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रिया राबवावी  अशी मागणी त्यांनी केली.

**होल्ड बाईट उद्धव**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर असूनही विरोधकांना दमदाटी करत आहेत, सत्ताधारी पक्षाचा प्रचार करत आहेत, त्यामुळे त्यांना निलंबित करावं अशी मागणीही उद्धव ठाकरे यांनी केली.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही बिनविरोध निवडीला विरोध केला. भाजपा चुकीचे पायंडे पाडत असून जनतेनं याचा विचार करायला हवा असं ते म्हणाले.

**<><><><><>**

२०२५ या वर्षात देशात १५ कोटी टनांपेक्षा जास्त तांदूळ उत्पादन झाल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे.  ICAR, अर्थात भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं शिवराजसिंह यांनी आज लोकार्पण केलं. त्यावेळी ते बोलत होते. तांदूळ उत्पादनात भारतानं चीनला मागे टाकलं असून, भारत हा जगातला आघाडीचा तांदूळ निर्यातदार देश बनल्याचं ते यावेळी म्हणाले.

शेतकऱ्यांना रास्त भावात दर्जेदार बियाणं उपलब्ध व्हावं, हे सरकारचं ध्येय आहे. त्या अनुषंगाने गेल्या काही वर्षांमध्ये देशात बियाण्यांचं ३२ शे पेक्षा जास्त वाण विकसित करण्यात आलं असून, ते शेतकऱ्यांपर्यंत लवकरात लवकर पोहोचवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

विकसित भारत जी रामजी योजना पूर्वीच्या मनरेगा योजनेच्या तुलनेत अधिक पारदर्शक आणि कल्याणकारी असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान आंनी आज सांगितलं. या योजनेबद्दल काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. मनरेगा योजनेसाठी प्रचंड आर्थिक तरतूद करुनही त्यातून दीर्घकालीन विकासाचं काम होऊ शकलं नाही, कारण त्यात भ्रष्टाचार होता असं ते म्हणाले. पूर्वीच्या योजनेपेक्षा जास्त दिवस काम देण्याची तरतूद जी रामजी मधे आहे, तसंच काम देता आलं नाही तर बेरोजगारी भत्ता देण्याची किंवा कामाचे पैसे वेळेवर दिले नाहीत तर अधिकाऱ्यांना दंड करण्याची तरतूदही नव्या योजनेत आहे, अशी माहिती त्यांनी दिली. नव्या योजनेने ग्राम सभा आणि ग्रामपंचायतीला जास्त अधिकार दिले आहेत असं ते म्हणाले. काँग्रेसने हा फरक समजून घ्यावा आणि संभ्रम निर्माण करणं थांबवावं असं आवाहन त्यांनी केलं.

जी रामजी योजनेबद्दल हिंगोली जिल्ह्यातल्या गिरगावचे सरपंच प्रमोद नादरे पाटील यांनी आकाशवाणीला दिलेली ही प्रतिक्रीया....

- **- - होल्ड - बाईट- प्रमोद नादरे पाटील - - -**

जी रामजी योजनेबद्दल धाराशिव जिल्ह्यातल्या एका गावचे सरपंच सुहास घोगरे यांनी आकाशवाणीला दिलेली प्रतिक्रिया..

- **- - होल्ड - बाईट - सुहास घोगरे - -**

- **<><><><><>**

सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकचं यजमानपद मिळवण्याकरता भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं होत असलेल्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं उद्घाटन त्यांनी आज दूरस्थ पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. विविध खेळांमध्ये २०१४ सालापासून देशाची कामगिरी सातत्यानं सुधारत असून 'जेन झी'ची तरुण पिढी हातात तिरंगा घेऊन भारताचं प्रतिनिधित्व करताना

पाहून देशाचा उर अभिमानानं भरून येतो. प्रत्येकाला आपापल्या भूमिका निभावतानाच त्यांच्या जबाबदाऱ्याही पार पाडायच्या असतात. मात्र, जेव्हा प्रत्येकजण आपापल्या जबाबदाऱ्या गांभीर्यानं पार पाडतो, तेव्हाच यशाचं शिखर गाठता येतं. देशाचा प्रवासही याच दिशेनं होत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

तायक्वांडो खेळाच्या क्रमवारीत भारताच्या रुपा बायोर हिनं आशियातलं अव्वल स्थान पटकावलं आहे. जागतिक क्रमवारीत ती सहाव्या स्थानावर पोहोचली असून ही कामगिरी करणारी ती पहिली भारतीय खेळाडू आहे.

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी रुपा बायोरच्या या कामगिरीबद्दल अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या परीक्षा पे चर्चा या राष्ट्रीय संवादाच्या नवव्या भागात सहभागी होण्यासाठी इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षक पात्र आहेत. संबंधितांनी यात सहभागी होण्यासाठी माय जी ओ व्ही संकेतस्थावर नोंदणी करण्याचं आवाहन केंद्र सरकारतर्फे  समाज माध्यमांवर करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज समारोप होत आहे. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ गुजराती साहित्यिक रघुवीर चौधरी, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांसह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. आज दिवसभरात संमेलनात, पुस्तक चर्चा, मुलाखत, कविसंमेलन, परिसंवाद आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे .

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते उद्या गोव्यात वास्को इथं समुद्र प्रताप या भारतीय तटरक्षक दलाच्या पहिल्याच प्रदूषण नियंत्रण जहाजाचं कार्यान्वयन होणार आहे. समुद्राच्या पाण्यात तेल गळती झाल्यास तात्काळ निदान करुनदूषित पाण्यातून तेल वेगळं करणं  तसंच दूषित घटकांचं विश्लेषण करण्यात हे जहाज सक्षम आहे. या जहाजाच्या निर्मितीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक स्वदेशनिर्मित  सामग्री वापरण्यात आली आहे. या

जहाजामुळे  भारतीय तटरक्षक दलाच्या प्रदूषण प्रतिसाद, अग्निशमन आणि सागरी सुरक्षा क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.

**//<><><><><>//**